महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ६८३९ दि.- २२/१/२०१९

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - २२/०१/२०१९ दिनांक - दुपारी ०३.३० वा.

**स्थळ** - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. भरत ब. जैन (सुराणा)**
तारा अपार्टमेंट, फ्लॅट नं.६,
महर्षिनगर, गुलटेकडी
पुणे ४११०३७. } **अपिलार्थी**

**श्री. मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.भरत ब.जैन (सुराणा) (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ३०/१०/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ३०/१०/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी दि.०१/०४/२०१५ ते दि.२९/१०/२०१८ पर्यंत मोर्या कंट्रक्शन, साईलीला कंट्रक्शन व गांजूळ ईन्टरप्राईजेस या ठेकेदारांना देण्यात आलेल्या कामाबाबतची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ३०/१०/२०१८ | ३०/१०/२०१८ | २८/११/२०१८ | ०५/११/२०१८ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न दिल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक २४/१२/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| २४/१२/२०१८ | २४/१२/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत नाही. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.२२/०१/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | वरील कालावधीत वरील तपशील (विषय) च्या ठेकेदाराना देण्यात आलेल्या कामाचा वर्कऑर्डरची प्रत व त्या त्या कामाची एम.बी. व त्यांना वेळोवेळी देण्यात आलेल्या रक्कमच्या तपशीलाची प्रत देणे. | विषयांकित बाबत संदर्भ क्र.१ चे पत्रान्वये आपण सन २०१५ ते सन २०१८ चे कालावधीतील ठेकेदार मे.श्री.मोरया कन्स्ट्रक्शन, मे श्री साई लीला कन्स्ट्रक्शन, मे श्री गाजूल एन्टरप्रायझेस यांनी केलेल्या कामांची माहिती मागितली आहे. |
| मुद्दा क्र.२ | वरील कालावधीत वरील तपशील चे तीन्ही | |

| | | |
|---|---|---|
| | ठेकेदाराच्या कामाबाबत आलेल्या तक्रारीची प्रत व त्या त्या तक्राराच्या वर केलेल्या कार्यवाहिची प्रत देणे. | सदर माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने माहिती संकलीत करण्याचे काम सुरू आहे. संदर्भांकित माहिती संकलीत झाल्यानंतर त्वरीत आपणांस कळविण्यात येईल. |
| मुद्दा क्र.३ | तक्रारानंतर (वरील ठेकेदाराच्या कामाची) वरीष्ठानी कार्यवाहिची पत्र दिला नंतर हि सबंधीत अधिकारी यांनी कार्यवाहि केली नसाल तर त्या अधिकारी वर केलेल्या कार्यवाहिची प्रत देणे. | |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक २२/०१/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.भरत ब.जैन (सुराणा) हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री.अजय खामकर, श्री.पंकज अंबे व श्री.हनुमान खलाटे हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.भरत ब.जैन(सुराणा) यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्यांबाबतची महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालयाकडील सद्यस्थितीत उपलब्ध असणारी माहिती पुढिल ०७ दिवसात अपिलार्थी श्री.भरत ब.जैन(सुराणा) यांना विनामुल्य उपलब्ध करून देणेत यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

22.01.19
(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

टिप –

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.भरत ब.जैन(सुराणा),तारा अपार्टमेट, फ्लॅट नं.६, महर्षिनगर, गुलटेकडी, पुणे – ४११०३७.

२. मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

३. सर्व सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.